Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/६४४९
दिनांक-२१/१२/२०१७.

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,सर्व विभागीय मंडळे

विषय :- शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दतीबाबत...

संदर्भ :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२, दिनांक २४ नोव्हेंबर ,२०१७.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/६०५० दि.०२/१२/२०१७
३. शासन शुध्दीपत्र क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दि.२०/१२/२०१७

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र.३ च्या पत्राचे अवलोकन व्हावे. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत दिनांक २४/११/२०१७ व दि.२७/९/२०१७ रोजीचा शासन निर्णय पुढील उचित कार्यवाहीसाठी आपल्याकडे पाठविण्यात आला आहे. (सोबत संदर्भ क्र.३ चे शासन शुध्दीपत्र जोडले आहे.) त्यानुसार आपले स्तरावरुन खालीलबाबत योग्य कार्यवाही करणेत यावी.

१. शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ मधील परिच्छेद क्र.२.३.२ हा "विद्यार्थी इलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही" असा आहे. त्या ऐवजी "विद्यार्थी इलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही. तथापि सदर अट मार्च,२०१९ च्या परीक्षेपासून लागू करण्यात येईल." असे वाचावे असे नमूद केले आहे. याबाबत आपले स्तरावरून सर्व संबंधितांना अवगत करावे

२. शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार चित्रकलेसाठी सवलतीचे गुण देण्याबाबतचे प्रमाणपत्र परिशिष्ट-ब नुसार विहित करण्यात आले होते. त्यामध्ये सुधारणा करण्यात आली असून दिनांक २०/१२/२०१७ चे शुध्दीपत्र व संलग्न सुधारित परिशिष्ट-ब शुध्दीपत्रानुसार सुधारित परिशिष्ट-ब चे प्रमाणपत्र मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख, संबंधित शाळेचे/केंद्राचे नाव रबरी शिक्क्यासह सादर करणेबाबत सर्व संबंधितांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.

३. शासन पत्र क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ शालेय शिक्षण विभाग दि.२१/१२/२०१७ (विषय-रिट याचिका क्र.१४००३/२०१७ समिक्षा गुणवंत वाडिभस्मे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी) नुसार दिनांक २०/१२/२०१७ रोजीच्या शुध्दीपत्रानुसार जे विद्यार्थी इंटरमिजिट ड्रॉईंग परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म/प्रस्ताव शाळांकडे सादर करणेसाठी पुरेसा कालावधी आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, इंटरमिजीट ड्रॉईंग परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शाळांकडे प्रस्ताव सादर करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत असून सदरची वाढीव मुदत दिनांक १० जानेवारी २०१८ अशी राहील. व संबंधित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २० जानेवारी २०१८ अशी राहिल. ही बाब देखिल सर्व संबंधितास अवगत करुन द्यावी.



परीक्षा (आर्ट) exam 7/Arts gr new | 23
27/12

तरी उपरोक्त शासन शुध्दीपत्र व शासन पत्रानुसार सर्व विभागीय मंडळांनी आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदरील शासन शुध्दीपत्र आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच शासन पत्रातील मुदतीनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे.तसेच आपल्या स्तरावरुनही सदरबाबत प्रसिध्दी देणेत यावी. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

सोबत - शासन शुध्दीपत्र व शासन पत्राची प्रत

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव,महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी- व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

---

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

पत्र क.नाविमं/पमा/5948
नागपूर, दिनांक : 28 /12/2017

प्रती,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग, नागपूर.

उपरोक्त दिनांक 21/12/2017 च्या पत्रानुसार व सोबतच्या शासन शुध्दीपत्रानुसार इ. 10 वी मार्च 2018 चे परीक्षेकरीता शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला बांबतचे प्रस्ताव दिनांक 20 जानेवारी 2018 पर्यन्त विभागीय मंडळाकडे सादर करण्यात यावे. त्यानंतर आलेले प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

exam 7/Arts gr new | 24

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतचे सुधारित कार्यपध्दती-शुध्दीपत्र

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन शुध्दीपत्र क्रमांकः :- संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २० डिसेंबर, २०१७

**संदर्भ :-** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२, दि. २४.११.२०१७

**शासन शुध्दीपत्र :-**

संदर्भाधीन दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २.३.२ हा "विद्यार्थी इलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही." असा आहे. त्याऐवजी "विद्यार्थी इलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही.तथापि,सदर अट मार्च, २०१९ च्या परीक्षेपासून लागू करण्यात येईल." असे वाचावे.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये चित्रकलेसाठी सवलतीचे गुण देण्याबाबतचे प्रमाणपत्र परिशिष्ट-ब नुसार विहीत करण्यात आले होते.त्यामध्ये सुधारणा करण्यात येत असून सुधारित परिशिष्ट-ब सोबत जोडल्याप्रमाणे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२०१२३९२६४८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=Baban Ranganath Mali
Date: 2017.12.20 13:56:47 +05'30'

(बी.आर.माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

४) मा. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य पुणे
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
९) कला संचालक, कला संचालनालय, मुंबई
१०) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (सर्व)
११) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१३) सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (पूर्व/पश्चिम/उत्तर)
१४) निवड नस्ती एसडी-२

## सुधारीत परिशिष्ट-ब

दिनांक---------------------------

# प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी------------------------------- हा /ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परिक्षा सन ------------मध्ये-----------श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण होताना तो/ ती------------------ इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता/होती.

आ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी---------------------------------------------------हा / ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परीक्षा सन ------------- मध्ये उत्तीर्ण झाला/ झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च --------------- मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ:-

दिनांक:-

**मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख**
**संबंधित शाळेचे/ केंद्राचे नाव**
**(रबरी शिक्क्यासह)**

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र. २०२/एसडी-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : २१ डिसेंबर, २०१७

प्रति,
अध्यक्ष,
राज्य मंडळ, पुणे.

विषय : रिट याचिका (स्टँम्प) क्र. १४००३/२०१७
समिक्षा गुणवंत वाडिमस्मे
विरुध्द
महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ:-१. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र.२०२/एसडी-२
दि. २४ नोव्हेंबर, २०१७.
२. शुध्दीपत्र क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी- २
दि. २० डिसेंबर, २०१७.

दि. २४ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

या शासन निर्णयातील परिच्छेद क्र २.३. २) मधील तरतूदी मध्ये शासन शुध्दीपत्र दि. २० डिसेंबर, २०१७ अन्वये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार विद्यार्थी इलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही, ही अट मार्च, २०१९ च्या परीक्षेपासून लागू करण्यात आली आहे.

सदर शुध्दीपत्रामुळे जे विद्यार्थी इंटरमिजीट ड्रॉईंग परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म / प्रस्ताव शाळांकडे सादर होणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, इंटरमिजीट ड्रॉईंग परीक्षेतील विद्यार्थ्यांना शाळांकडे प्रस्ताव सादर करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत असून अंतिम दिनांक १० जानेवारी, २०१८ असा राहील. या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २० जानेवारी, २०१८ अशी राहील.

कृपया या अनुषंगाने आवश्यक सूचना सर्व संबंधित माध्यमिक शाळांना आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात.

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी:-
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.